# घाबरुन न जाता वेळेत स्थलांतरीत होवून प्रशासनाला सहकार्य करा; शासन आपल्या पाठीशी

## पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिला पूरग्रस्तांना धीर



**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्याला वेळोवेळी आलेल्या पुराचा अनुभव असून पाणी कोणत्या भागात आल्यानंतर पुरस्थिती निर्माण होते याचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरुन न जाता नदीची पाणी पातळी व पूर परिस्थिती पाहून सुरक्षित ठिकाणी वेळेत स्थलांतरित होवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करुन शासन-प्रशासन आपल्या पाठीशी आहे, जिल्ह्यात पुराच्या पाण्यामुळे घरांची पडझड, दुकाने, टपऱ्या, शेती आदींचे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाच्या निकषानुसार तातडीने मदत देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन पालकमंत्री हसन मुश्रीफ दिले.

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी आज कोल्हापूर शहरातील सुतारवाडा, कुंभार गल्ली, जामदार क्लब येथील पुरबाधित भागाला तसेच चित्रदुर्ग मठ निवारागृहाला भेट दिली. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून पुरस्थितीबाबतची माहिती जाणून घेतली. तसेच निवारागृहातील नागरिकांशी त्यांनी संवाद साधून त्यांना धीर दिला. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रशासक के.मंजूलक्ष्मी उपस्थित होत्या.

यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक स्थिती अशी आहे की या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दरवर्षी पाऊस पडतो. धरणांची संख्याही मोठी असल्यामुळे त्या ठिकाणी धरणे भरल्यानंतर नेहमीच मोठ्या प्रमाणात विसर्ग होतो. यामुळे धरण क्षेत्रात पडणारा पाऊस आणि खालील पाऊस यांचे पाणी मोठ्या प्रमाणात नदीच्या पात्रातून वाहते. साधारण दर दोन वर्षांनी नेहमीच पुरस्थिती निर्माण झालेली आपण पाहिलेली आहे. त्यामुळे आता पाणी पातळी पाहून नागरिकांनी स्वतःहून निर्णय घेऊन स्थलांतरीत व्हावे. या प्रक्रियेत प्रशासनाकडून ठिकठिकाणी निवारागृहांची व्यवस्था करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी जिल्ह्यात एनडीआरएफचे एक पथक दाखल झाले असून आणखी एक पथक उद्या दाखल होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिवृष्टी आणि धरणातून होणारा विसर्ग आणि त्यामुळे वाढत जाणारी नदीची पाणी पातळी व पूर परिस्थितीचा विचार करुन नागरिकांचे वेळेत स्थलांतर करा. कोणत्याही परिस्थितीत जीवितहानी होणार नाही याची दक्षता घ्या. स्थलांतरीत नागरीकांना चहा, नाश्ता, भोजन, औषधे व अन्य सोयी -सुविधा वेळेत पुरवा, अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आपत्ती व्यवस्थापन नियोजनाबाबत बैठकीत दिल्या.

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीने धोका पातळी ओलांडली असल्यामुळे शहर व ग्रामीण भागात शेतीत व रहिवासी वस्तीत देखील पुराचे पाणी गेले आहे. जिल्ह्यात पुराच्या पाण्यामुळे घरांची पडझड, दुकाने, टपऱ्या, शेतीचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाच्या निकषानुसार तातडीने मदत देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. यासाठी नुकसानग्रस्त भागाचे वेळेत पंचनामे करावेत, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# लोकसभेच्या धक्क्यातून सावरण्यासाठीच लोकप्रिय घोषणा : सतेज पाटील



### समन्वयामुळे अडचण दूर

**अलमट्टीचा विसर्ग वाढवावा अशी विनंती कर्नाटकचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली. त्यांनीही त्याला प्रतिसाद दिला असून, त्याचा परिणाम दिसत असल्याचा दावा आमदार पाटील यांनी केला. बेळगाव व कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांच्यात समन्वय सुरू असून यामुळे अडचण येणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

### सानुग्रहअनुदान ताबडतोब द्या

**सरकारने लोकांपर्यंत मदत पोहोचवणे गरजेचे आहे. उगीच कागदी घोडे नाचवण्यात अर्थ नाही. त्यामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे अशांना सानुग्रह अनुदान ताबडतोब द्यावे, अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.**

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीत जनतेने दिलेल्या धक्क्यातून सावरण्यासाठीच महायुती सरकारकडून लोकप्रिय घोषणा केल्या जात आहेत. मात्र, त्यांचा हा सर्व खटाटोप आगामी निवडणुकीसाठीच सुरू असल्याचे जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे जनताच त्यांना या धक्क्यातून सावरू देणार नाही, असा दावा माजी मंत्री आमदार सतेज पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना केला. सरकारच्या लोकप्रिय घोषणांवर वित्त विभागानेच चिंता व्यक्त केल्याने या सरकारमध्ये समन्वय नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

आमदार पाटील म्हणाले नदी जवळील अतिक्रमण हे महापालिका क्षेत्राबरोबरच बाहेरचेही आहे. महामार्गाजवळ भराव टाकून अतिक्रमण केले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हे गांभीर्याने घ्यावे. मागील अनुभव असतानाही ते बांधकाम थांबवू शकले नाहीत, हे दुर्दैवी आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पात महाराष्ट्राला सापत्न वागणूक दिली. निदान महापुरावेळी मदत करताना तरी त्यांनी राज्याला सापत्न वागणूक देऊ नये, आपत्तीत त्यांनी राजकारण करू नये, असा टोला पाटील यांनी लगावला. हिडकल धरणातील पाण्यामुळे गडहिंग्लज व चंदगडमधील काही भागांत समस्या निर्माण होते. या धरणातील पाणीही व्यवस्थित सोडण्याबाबत बेळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली असल्याचे आमदार पाटील म्हणाले.

# मका उत्पादक शेतकरी येणार अडचणीत! राजू शेट्टी



**जयसिंगपूर :** केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या सचिवांनी आयात शुल्क न लावता आपल्या देशात मका आयात करण्यास परवानगी द्यावी यासाठी वाणिज्य मंत्रालयाकडे मागणी केलेली आहे. सदरची मागणी चुकीची असून येत्या महिन्याभरात खरीप हंगामातील मक्का बाजारात येणार आहे. यामुळे हा निर्णय झाला तर मका उत्पादक शेतकरी संकटात सापडणार आहे. याकरिता सदरचा निर्णय घेण्यात येवू नये अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी वाणिज्य मंत्री पियुष गोयल व कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली.

देशांतर्गत, मका आधीच अत्यंत कमी किमतीत विकला जातो आणि उत्पादन खर्च वाढल्याने किमान आधारभूत किंमत (चडझ) वाढवण्याची मागणी शेतकरी सातत्याने करत आहेत. आयात शुल्काशिवाय मक्याच्या आयातीला परवानगी दिल्याने देशांतर्गत मक्याच्या किमती आणखी घसरतील, ज्यामुळे आमच्या मका उत्पादकांचा नाश होईल. मका हे एक महत्त्वाचे पीक आहे, विशेषत: निकृष्ट दर्जाची जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी, आणि प्रामुख्याने मराठवाडा आणि महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशात पीक घेतले जाते. कारण बहुतेकदा ते त्यांच्या उत्पन्नाचे एकमेव विश्वसनीय स्रोत आहे. यावर्षीचा मान्सून चांगला असल्याने शेतकऱ्यांना मक्याचे अधिक उत्पादन मिळेल. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मका आयात करण्याची गरज नाही.

### अल्पभुधारक असलेल्या मका उत्पादक

**शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी मक्याच्या किमतीत वाढ करण्यात यावी आणि देशांतर्गत किमतीत आणखी घसरण रोखण्यासाठी परदेशातून मक्याची आयात तात्काळ थांबविण्याची मागणी राजू शेट्टी यांनी केली आहे.**

देशातील पोल्ट्री उत्पादक लॉबीच्या दबावामुळे हा निर्णय घेण्यात आला असावा, असे दिसते.आपण पोल्ट्री उद्योगाच्या गरजा समजून घेत असताना, आपल्या शेतक-यांच्या उपजीविकेच्या विरूद्ध असा निर्णय न घेता समतोल राखणे आवश्यक आहे.

# भूस्खलनाने बाजुपट्टीसह रस्ता खचला

**पन्हाळा :** कोकणला जोडणाऱ्या नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गा वरील वाघबीळ घाटात पुलाचे काम चालू असलेल्या वळणावर दरीच्या बाजूला मोठ्या प्रमाणात केलेल्या उत्खनना मुळे रस्त्याला लागून असलेल्या दरीच्या दिशेने रस्त्याची अंदाजे पाचशे मिटर लांबीची बाजूपट्टी भूस्खलनाने खचली आहे तर रस्त्यावर बारीक प्रमाणात तडे गेल्याने होणारी वाहतूक धोकादायक होत आहे सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. वाघाबीळ घाटात महामार्ग रुंदीकरणाचे काम चालू आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन केले आहे. येथील चालू असलेल्या जुन्या रस्त्याच्या बाजूपट्टी व संरक्षक भिंतीसह दरीच्या बाजूला ढासळू लागली आहे.त्यामुळे हा मार्ग बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. भूस्खलनामुळे रस्ता खचून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरीकडील रस्त्याच्या बाजूपट्टीला घासून उतारावर उत्खनन केले आहे. उत्खनना मुळे चालू रस्त्याच्या बाजूपट्टीचा भाग रस्त्याच्या कडेपर्यंत ढासळला आहे. वाघबीळ घाटाच्या एकाबाजूला खोल दरी आहे. डोंगरावरून पावसाच्या पाण्याचा मोठा प्रवाह दरीत पडतो. सध्याच्या मुसळधार पावसाने डोंगरावरून दरीत जाणारे पाण्याचे प्रवाह प्रवाहित झालेत डोंगरात मुरणाऱ्या पाण्यामुळे दरीच्या उतारावरील माती घसरण्याचे प्रमाण वाढल्याने भुस्खलन होऊन चालू रस्त्याच्या वळणापासून बाजूपट्टी त्यावरील संरक्षक भिंतीसह तुटून गेली आहे. येथे ढसाळलेली माती भुस्खलन थांबवण्यासाठी लावलेल्या लोखंडी प्लेट सह दरीकडे घसरली आहे. ठेकेदाराची तात्पुरती मलमपट्टी कूचकामी ठरलेली आहे. सुमारे शंभर ते दीडशे मिटर लांबीची बाजूपट्टी त्यावरील संरक्षक भिंतीसह दरीच्या बाजूला कलली असून कोणत्याही क्षणी तुटून पडण्याची शक्यता आहे. कोकणाला जोडणारा रस्ता वर्दळीचा असल्याने येथून मोठ्याप्रमाणात प्रवासी व आवजड वाहतूक चालू असते. नेमके घाटातील सर्वात मोठ्या वळणावरील बाजूपट्टी तुटली आहे.



**वाघबिळ बसथांब्या पासून कोल्हापूरला जाताना असलेल्या मोठ्या वळणावरती दरीच्या बाजूला केलेल्या उत्खननामुळे रस्त्याच्या बाजूपाट्टीच्या भागातून निसटलेला भराव.**

### वाहतूक धोकादायक ठरू शकते

जा ये करणाऱ्या आवजड वाहनांमुळे रस्ता खचुन मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी शासनाने याठिकाणी रस्त्याला धोका पोहचूनये म्हणून तातडीने ठोस उपाययोजना केली तरच दुर्घटना टाळेल अशी प्रतिक्रिया प्रवाशी, नागरीकांच्यातुन व्यक्त होत आहे.

# भोर तालुक्यातील नागरीकांना सतर्कतेचा इशारा

**भोर :** भोर तालुक्यातील डोंगरांच्या घाटमाथ्यावर दोन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह संततधार मुसळधार पाऊस सुरू असून, जनजीवन विस्कळित झाले आहे. झाडे उन्मळून पडणे, विजेचे खांब कोसळणे, वादळी वाऱ्यामुळे घरचि छप्पर उडणे, भिंती पहाणे, दरडी कोसळणे आणि वाहतूक बंद होणे, असे प्रकार घडत आहेत.त्यामुळे तालुका प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले असून आपत्ती व्यवस्थापनाच्या कर्मचा ऱ्यांना सावध राहण्याच्या सूचना तहसिलदार सचिन पाटील यांनी दिल्या आहेत.

नैसर्गिक आपत्ती व अपघात प्रसंगी तहसील कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष (०२११३- २२२५३९), पोलिस (०२११३-२२२५३३) ठाणे आदी सोबत गावकामगार तलाठी आणि मंडलाधिकारी कार्यालयांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार सचिन पाटील यांनी केले आहे.

भोर तालुक्यातील भाटघर धरण आणि नीरा देवघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर कायम आहे. मागील २४ तासात भाटघर धरणाच्या कुरुंजी येथे आणि नीरा देवघर धरणाच्या नीरा नदीचे उगमस्थान असलेल्या शिरगाव येथे सर्वाधिक पावसा ची नोंद झाली आहे. गुरुवार (दि.२५) सकाळी सात वाजता कुरुंजी येथे २४८ मिलिमीटर आणि भुतोंडे येथे २४३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर, शिरगाव येथे गुरुवारी पहाटे २ वाजता १९५४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.


पांगारी येथे गुरुवारी पहाटे ५ वाजेपर्यंत १६४ मिलिमीटर पाऊस पडला आहे, नीरा-देवघर धरणाच्या साइटवर ९५ मिलिमीटर तर भाटघर धरणाच्या साइटवर ३५ मिलिमीटर पावसाची नोंद झालो आहे.

# विजेच्या खांबावरून घसरून कर्मचाऱ्याचा अपघात

**भोर -** भाटघर परिसरातील पसुरे (ता.भोर) येथील दिघेवस्ती या ठिकाणी वीज दुरुस्तीसाठी महावित रणचा कर्मचारी विजेच्या खांबावर चढला असता कर्मचाऱ्याचा खांबावरून पाय घसरून अपघात घडल्याची घटना गुरुवार (दि.२५) दुपारी दीडच्या सुमारास घडली. सुदैवाने सदर कर्मचारी बचावला असुन सद्यस्थितीला शिरवळ येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.

तालुक्यातील सर्वच भागात अतिवृष्टी होत आहे, पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याने तालुक्यातील वेळवंड खोऱ्यात वीजेचा लपंडाव सुरू आहे.भाटघर परिसरातील अनेक गावात वीज खंडित होत आहे.या परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असणा ऱ्या पसुरे येथे वीज दुरुस्ती करिता या भागातील वीज कर्मचारी किरण बंडे हे वीज खांबावर चढले होते. यादरम्यान खाली उतरताना थांब पावसामुळे निसरडा व शेवाळयुक्त झाल्याने हात व पाय घसरून जमिनीवर कोसळला. किरण याच्या छातीस दुखापत झाल्याने त्यांना तात्काळ शिरवळ येथील एका खाजगी रुग्णाल यात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

भाटघर परिसरात पावसाची अतिवृष्टी होत असल्याने तांत्रिक अडचणींमुळे वीज वारंवार खंडित होत आहे.यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. सदरचा परिसर डोंगराळ असल्याने या भागात महावि तरणच्या कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. त्यातच दोन ते तीन कर्मचाऱ्यांना अठ्ठावीस ते तीस गावांना सेवा द्यावी लागत आहे. या परिसरात पाऊस मोठ्या प्रमाणात असून विद्युत खांबावर, डीपीवर फेज टाकणे, जंप टाकणे, डिओ टाकणे,मीटर लाईन टाकणे हि सर्व कामे पाऊस पडत असताना अवघड होत आहेत.



# ३१ जुलैपर्यंत किल्ले शिवनेरीवर जाण्यास प्रतिबंध

## गणेश दरवाजा जवळ काही भाग कोसळल्याने शिवनेरीवर पर्यटकांना जाण्यास बंदी

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यामध्ये गेले ४-५ दिवसांपासून पडत असलेल्या भिजपावसामुळे दि. २६ रोजी किल्ले शिवनेरी येथील गणेश दरवाजाचे वरील बाजूस असलेला ७-८ फूट लांब व ५-६ फूट रुंदीचा खडक ढासळून खालपर्यंत घसरून आला आहे. त्यामुळे गणेश दरवाजाच्या लगत असलेली किल्ल्याची ८-९ फूट लांबीची तटबंदी तुटली आहे.

या कारणामुळे पुढील ४-५ दिवस अशाच प्रकारे भिजपाऊस चालू राहणार असल्याने व पुढील धोका पाहता किल्ले शिवनेरीवर येणाऱ्या पर्यटकांना येथे ३१ जुलै २०२४ पर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे अशी माहिती जुन्नरचे वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी दिली.

जुन्नर, खेड, आंबेगाव तालुक्यातील प्रामुख्याने किल्ले परिसर, धबधबा परिसर आदी ठिकाणी पर्यटनासाठी पर्यटक येत असतात.

पावसाळयातील पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने दि. २ जुलै २०२४ ते दि. ३१ जुलै २०२४ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले असून या आदेशाची अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर यांना उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी पत्राद्वारे कळविले आहे की, पावसाळयातील पर्यटनासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आली असून दि.३१ जुलै पर्यंत किल्ले शिवनेरी पर्यटनासाठी बंद करून पर्यटकांना किल्ल्यावर प्रवेश बंदी करण्यात आली आहे. त्यानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन न करणाऱ्या पर्यटकांवर भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ व तत्सम कायदे व नियमांतर्गत कारवाई करण्यात येईल असे पत्र वनक्षेत्रपाल जुन्नर यांना उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी दिले आहे.

# पाटणमध्ये भूस्खलन झालेल्या मिरगावलासुद्धा प्रशासनाची भेट

**पाटण :** सध्या अतिवृष्टीमुळे अनेक घराची पडझड होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. काही जागेपर्यंत जिल्हा प्रशासन पोहच शकले नाही . मात्र ,पाटण तालुक्यातील भूस्खलन झालेल्या मिरगाव गावात सातारा जिल्हा पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार रात्रीच्या गडद अंधारातही मिरगावला प्रशासन भेट दिली . या भेटीच्या वेळी कुठलेही भूस्खलन झाले नाही.

कोयना धरणाने प्रसिद्धीस पावलेल्या पाटण तालुक्यातील कोयना नगर परिसरातील मिरगाव या छोट्याशा खेड्यात २०२१ मध्ये भूस्खलन झाले होते . मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली होती. गेले दोन आठवडे कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई व जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचनेनुसार तातडीने पाटण प्रांत अधिकारी व तहसीलदार यांनी कार्यालयीन कामकाज उरकून रात्री पाहणी करून कोणीही अडचणीत नाही. याची खात्री करून घेतली.

भूस्खलन बाधित लोकांना निवारा देण्यासाठी कोयनानगर येथील १५० निवारा शेडमध्ये पुनर्वसन केले आहे . तथापि मिरगावमध्ये अजूनही काही घरे सुस्थितीत असल्याने काही कुटुंब त्या ठिकाणी शेती कामासाठी जात असतात. सध्या पाटण तालुक्यात कोयना धरण क्षेत्रामध्ये जोरदार अतिवृष्टी होत आहे . या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई तसेच जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्हास्तरावर क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्स घेऊन संभाव्य भूस्खलन बाधित होणाऱ्या जागेचा आढावा घेतला. कोणी कुटुंब किंवा काही व्यक्ती तिथे राहत तर नाही ना याची खात्री करण्याचे निर्देश दिले होते.

भूस्खलन बाधित लोकांना निवारा देण्यासाठी कोयनानगर येथील १५० निवारा शेडमध्ये पुनर्वसन केले आहे . तथापि मिरगावमध्ये अजूनही काही घरे सुस्थितीत असल्याने काही कुटुंब त्या ठिकाणी शेती कामासाठी जात असतात. सध्या पाटण तालुक्यात कोयना धरण क्षेत्रामध्ये जोरदार अतिवृष्टी होत आहे

# वाणिज्य शाखेत रोजगाराच्या मुबलक संधी - प्रा.डॉ.जे.पी.भोसले

**नारायणगाव :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार वाणिज्य शाखेत विविध बदल होत असताना वाणिज्य क्षेत्रात नवनवीन कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची गरज उद्योगांना आज भासत आहे. तरुण-तरुणींमध्ये देखील नवनवीन कौशल्ये निर्माण करण्याची क्षमता वाणिज्य शाखेच्या अभ्यासक्रमात आहे. म्हणून वाणिज्य शाखेत रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत. अशी माहिती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगावचे वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख व वरिष्ठ संशोधक प्रा.डॉ.जे.पी.भोसले यांनी दिली. आधुनिक शैक्षणिक पद्धतीत वाणिज्य शाखेचे महत्त्व या विषयावर नारायणगाव येथे पत्रकारांशी वार्तालाप कार्यक्रमात प्रा. डॉ भोसले बोलत होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# कुंभार बांधवांच्या समस्या; महापालिका प्रशासन धारेवर

**कोल्हापूर :** आमदार सतेज पाटील यांनी बापट कॅम्प मधील पूराची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी महानगरपालिका अधिकाऱ्यांना धारेवर धरत, योग्य त्या सूचना केल्या. मार्केट कमिटी मध्ये तत्काळ मूर्ती ठेवण्यास निवारा शेड उपलब्ध करून देण्यासह, मूर्ती हलवण्यास लागणाऱ्या सर्व यंत्रसामग्री तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

बापट कॅम्प मध्ये कुंभार समाजाची पाचशे हून अधिक कुटुंब राहत आहेत. २०१९ - २०२१ मध्ये यातील निम्म्या घरामध्ये पुराचे पाणी आले होते. सध्याची पूर परिस्थिती पाहता सर्व कुटुंबांना स्थलांतरित होण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, त्यानुसार काहींनी स्थलांतर केलेले आहे. मात्र कुंभार बांधवांच्या तयार मोठ्या गणेश मूर्ती बाहेर काढण्यास अडचणी येत आहेत. यावर आमदार सतेज पाटील यांनी महानगरपालिकेला मार्केट कमिटीची जागा उपलब्ध करून देण्यासोबत



त्यांना ठेण्यासाठी शेड, नेण्यासाठी ट्रॅक्टर ट्रॉली यासह त्यांना हवे असणारी सर्व मदत तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. यावेळी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, जल अभियंता हर्षजीत घाटगे उपस्थित होते. यावर्षी मागील पुरा पेक्षा दोन फूट पातळी कमी असून सुद्धा मागील पूर जिथं पोहचलेला तिथं पाणी पोहचलं आहे, याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली.

बाईट - सतेज पाटील - ००.११ ते ०१.२१

अधिकाऱ्यांनी तात्काळ मार्केट कमिटी या ठिकाणी मूर्ती ठेवण्यास जागा उपलब्ध करून देण्यासह जाधववाडी हायस्कूल या ठिकाणी नागरिकांच्या स्थलांतराची सोय करण्यात आल्याची माहिती दिली.

याप्रसंगी आमदार सतेज पाटील यांनी ज्या घरामध्ये पाणी आलं आहे त्या ठिकाणी पाण्यातून जात पाहणी केली, यावेळी स्थानिक नागरिकांनी २०१९ - २१ च्या महापुरामध्ये आलेल्या आठवणी सांगत सध्या भेडसावणाऱ्या समस्या सांगितल्या. यावेळी आमदार ऋतुराज पाटील, आमदार जयश्री जाधव, माजी नगरसेवक राजू लाटकर, तोफीक मुल्लाणी, काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, दुर्वास बापू कदम, सतीश बाचणेकर, प्रकाश कुंभार, सागर तहसीलदार, प्रकाश आरळेकर, संजय बसतवडेकर, दत्तात्रय निवगेकर, किरण माजगावकर, संभाजी ठाणेकर,महेश वाळके, सुमित कुंभार आदींसह कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येनं उपस्थित होते. दरम्यान त्यांनी कदमवाडी इथं देखील भेट देऊन पूर पाहणी करून नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. याचा या समस्या तात्काळ मार्गी लावू असं आश्वासन त्यांनी दिलं.

## पसुरेत विजेच्या खांबावरून घसरून कर्मचाऱ्याचा अपघात

**भोर :** भाटघर परिसरातील पसुरे (ता.भोर) येथील दिघेवस्ती या ठिकाणी वीज दुरुस्तीसाठी महावित रणचा कर्मचारी विजेच्या खांबावर चढला असता कर्मचाऱ्याचा खांबावरून पाय घसरून अपघात घडल्याची घटना गुरुवार (दि.२५) दुपारी दीडच्या सुमारास घडली. सुदैवाने सदर कर्मचारी बचावला असुन सद्यस्थितीला शिरवळ येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.

तालुक्यातील सर्वच भागात अतिवृष्टी होत आहे, पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याने तालुक्यातील वेळवंड खोऱ्यात वीजेचा लपंडाव सुरू आहे.भाटघर परिसरातील अनेक गावात वीज खंडित होत आहे.या परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असणा ऱ्या पसुरे येथे वीज दुरुस्ती करिता या भागातील वीज कर्मचारी किरण बंडे हे वीज खांबावर चढले होते. यादरम्यान खाली उतरताना थांब पावसामुळे निसरडा व शेवाळयुक्त झाल्याने हात व पाय घसरून जमिनीवर कोसळला. किरण याच्या छातीस दुखापत झाल्याने त्यांना तात्काळ शिरवळ येथील एका खाजगी रुग्णाल यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. भाटघर परिसरात पावसाची अतिवृष्टी होत असल्याने तांत्रिक अडचणींमुळे वीज वारंवार खंडित होत आहे.यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

## पत्रकारांच्याआरोग्यासाठी सरसावल्यानगरसेविका



**मुंबई :** पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना आरोग्य विम्याचे कवच देण्यासाठी नगरसेविका आशाताई मराठे यांनी पत्रकार आरोग्य विमा अर्ज भरून त्यासाठी लागणारे शुल्क त्यांनी स्वतः भरले. कोरोना काळातही यांनी पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेतली होती. पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न सरकारी योजनेच्या माध्यमातून मार्गी लावल्याबद्दल सर्व पत्रकारांनी त्यांचे आभार मानले.

कोरोणा काळात काही पत्रकारांच्या नोकऱ्या गेल्या. काही पत्रकार मृत पावले. त्यावेळीही त्यांना किराणा सामान व आरोग्य मदत त्यांनी दिली होती. आजही अनेक पत्रकार आर्थिक परिस्थितीचा सामना करत आहेत. लाडकी बहिण, लाडका भाऊ योजना येत आहेत. पत्रकार कल्याणकारी योजना असावी यासाठी सरकारकडे मी पाठपुरावा करणार आहे. असे आशाताई मराठे यांनी यावेळी सांगितले.

मुंबई उपनगर परिसरातील सर्व पत्रकारांना महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून आरोग्य सेवा मिळावी यासाठी शिबिर आयोजन करून यावेळी अर्ज भरून घेण्यात आले. त्यासाठी लागणारे अर्ज शुल्क आशाताई मराठे यांनी भरले असून तीन दिवसानंतर या योजनेचे स्मार्ट कार्ड पत्रकारांना मिळणार आहे. भाजपा मंडळ महामंत्री गुरुदास पै, भाजपा महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ऍड. चेतना कोरगावकर, सावित्रीबाई फुले घरेलु कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष मराठे, देविदास वर्मा, पुष्पराज माने, उपनगर पत्रकार असोसिएशन चे सहसचिव समीर कर्णूक, उपाध्यक्ष संध्या श्रीवास्तव, पत्रकार आनंद श्रीवास्तव आदी पत्रकार उपस्थित होते.

# दुचाकी चोरटे जेरबंद

**कोल्हापूर-** दुचाकी चोरी करणाऱ्या तिघां विधी संघर्षग्रस्त बालकांना जुना राजवाडा पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. त्यांच्याकडून १ लाख ८५ हजार रुपयांच्या किंमतीच्या सात दुचाकी जप्त करण्यात आले असून पोलीस त्यांच्याकडे अधिक तपास करत आहे.

दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होते. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी शहरातील सर्व प्रभारी पोलिस अधिकाऱ्यांना दुचाकी चोरट्यांचा शोध घेण्याच्या सूचना केल्या होत्या. दरम्यान, जुना राजवाडा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे कर्मचारी एस एम लोहिया हायस्कूल परिसरात गस्त घालत असताना दोघेजण विना नंबर प्लेट मोटरसायकल वरून जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांच्याकडील दुचाकी ही चोरीची असल्याचे निष्पन्न झाले पोलिसांनी त्यांच्याकडं अधिक चौकशी केली असता तीन विधी संघर्षग्रस्त बालकांनी मिळून जुना राजवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सहा आणि करवीर पोलिसांच्या हद्दीतील एक अशा सात मोटरसायकली चोरी केल्याची कबुली दिलीय.

## हडपसरमध्ये उबाठा शिवसेनेकडून सिध्दी वृध्दाश्रमात अन्नदान व फळे वाटप

**हडपसर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट हडपसर शिवसेनेकडून हडपसर मधील कामधेनु येथील सिध्दी वृध्दाश्रमात आश्रमातील वृध्दांना फळे व खाऊ वाटप करण्यात आले.

माजी मुख्यमंत्री, पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून फळे वाटप करण्यात आले.

हड़पसर विधानसभा संघटक संजय बापु सपकाळ व विभाग प्रमुख दत्ता खवळे , अजय सकपाळ यानी सिद्धी वृद्धाश्रमात अन्नदान व फळांचा वाटप करण्यात आले यवेली सिद्धि आश्रम मधील .वृद्धांनी उद्धव ठाकरेंन आशिर्वाद दिले . यापसंगी शाखा प्रमुख अनिकेत सपकाळ उपशाखा प्रमुख



कुणाल वाघ , अनिल हावले ,गोटु पटोळे, कुणाल सपकाळ, अरुण पाटील संचालिका छायाताई माने ,सुनील माने, यशराज माने , अलका वराडे,अलका होलम, विल्मा सोन्स, सुशीला नालबागले, जयश्री जाधव, सुनीता जाधव , शिवसैनिक उपस्थित होते.

# कारगिल विजयी दिनानिमित्त दौंड भाजपवतीने माजी सैनिकांचा सत्कार

दौंड : कारगिल युद्धात भारतीय जवानांनी पाकिस्तानी सैनिकांचा दणदणीत पराभव करुन.दैदिपान.असा विजय मिळवला.हा दिवस कारगिल दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे. या विजयी दिनी आपण माजी सैनिकांचा

ज.पा. तर्फे आजी माजी सैनिकांचा सत्कार आपण करीत आहोत. यापेकक्षा जीवनत आनंद तो कोणता? असे ऊदगार स्वप्न निल शहा यांनी दौंड येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले आहेत.

२६ जुलै कारगीलदिना निमित्त दौंड भाजपच्यवतीने तालुक्यतील माजी सोनिकांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता.



२६ जुलै १९९९ रोजी भारतीय सैनिकानी कारगील युद्धत पाकिस्तनी सैनिकांचा दारुन आणी दणदणीत पराभव करुन विजय मिळवला. हा दिवस देशासाठी लढणाऱ्या आणि संरक्षणासाठी बलिदान दिलेल्या शूर वीरांची आठवण करून देतो म्हणून आजच्या दिनी तालुक्यतील माजीसैनिक यांचा शाल, श्रीफळ, पुस्पगुछ, आणी सन्मान चिन्ह देयुन सत्कार करण्यात आला्

सत्काराला ऊतर देताना माजी सैनिक संघटनेचेअधक्ष अशोक लोंढे म्हणाले, यापुर्व दौंढमधे असा विधायक उपक्रम झालेला नव्हता. दौंड भाजपने तो प्रथमच सुरु केला आहे, याचेक् आम्ही माजी सैनिक मनापासून स्वागत करतो.आमची कामे करून सहकार्य करावे. यावेळी दौंड भाजपाचे अधक्ष स्वप्नील शहा, सुभास डाबी भाजपचे शहरपदाधिकारी, कार्य करते, माजी सैनिक, त्याचे कुटुंबीय, आणी नागरिक ऊप

# आगामी दौंड विधान सभा निवडणुकीत आ. राहुल कुल पराभुत होतील : राजा तांबे

**दौंड :** आगामी दौंड विधान सभा निवडणुक ही अत्यंत अटीतटीने होवुन लढत दुरंगी,तिरंगी अगर अन्य ऊमेद वार वाढले तरी भाजपचे राहुल कुल हेच उमेदवार असतील आणी प्रचंड मताने पराभुत होतील.असे मत दौंड मधील प्रमुख कार्य कार्य करते राजा तांबे यानी राजदंड शी बोलताना व्यक्त केले आहे.

याबाबत पुढे बोलताना तांबे म्हणाले, सन २०१९ मध्ये तात्कलीन मुख्यमंत्री देवेंद्र फडनविस यांनी कुल यांचेसाठी साम, दाम दंड भैद निती आणी भगिरथ प्रयत्न करुनही कुल पडता पडता वाचले, ल ७५० मताने निवडून आले.

घाच वर्षा त कुल यांची कारकिर्द घसरलेली आहे. त्यांच्या असलेल्या भाजप हा जातीय वादी पक्ष असुन त्याना सर्व सामन्य जनता, शेतकरी, कामगार यांच घेनदेन नाही. महागाई, बेरोजगारी, संविधन बदलनयाच धोरन, आरक्षण निर्णय खेळ.यासह कुल यांनी भिमा कारखान्यत ५०० कोटीचा केलेली मनी लांडरिंग घोटाळा, कारखाना खाजगी व्यक्ती ला चालवणेस दिला की विकला हे जनतेला कळु दिले नाही, निष्ठावंत, कंत्राटदार, आणी मतलबी जवळच्या लोकांच पार्सलीटीने कामे करने, आणी विशेष बाब ज्यांचे सहकार्याने निवडुन आले. त्यांचेवर वर तंगडी करणे. या सर्व बाबत आणी आता दौंड मध्य भाजप मुक्त दौंड करण्याचा निर्धर दौंड च्य जनतेने ठामपणे केला आहे. या सर्व परीस्थिती न आगामी विधान सभा निवडणुकीत भाजपचे आमदार राहुल कुल हे७० हजार मताने पराभुत होतीलच.

# गावठी बनावटीचे पिस्तुल विक्रीसाठी आलेल्या इसमास अटक

**कोल्हापूर :** चंदगड तालुक्यातील पाटणे फाटा इथं गावठी बनावटीचे पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या एकाला चंदगड पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. शशीभूषण जीवनराव देसाई (वय ४८, रा. पुष्पनगर, गारगोटी, ता. भुदरगड) असं त्याचं नाव असून त्याच्याकडून विनापरवाना पिस्तुल आणि दोन जिवंत काडतूस असा ५० हजार ४०० रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केलाय.

शशीभूषण देसाई हा पिस्तूल विक्रीसाठी पाटणे फाटा इथं येणार असल्याची पोलीसांना माहिती मिळाल्यानंतर, त्या अनुषंगानं पोलिस निरीक्षक विश्वास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी हवालदार तुकाराम राजगिरे, अजय वाडेकर, आनंदा नाईक, सुनील माळी, स्वप्नील मिसाळ यांच्या पथकाला बुधवारी रात्री देसाई हा संशयितरित्या पाटणे फाट्यावर वावरत असल्याचं दिसून आलं. यावेळी पोलिसांनी त्याला ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे विनापरवाना गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे सापडली. एकूण ५० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

# अमरधाम स्मशानभूमीत अनेक समस्या वाढल्या

**हडपसर :** हडपसर मधील माळवाडी प्रभागात अनेक समस्यां वाढल्या असून नागरी समस्यां सोडविण्यात मनपा प्रशासन तसेच आजीमाजी लोकप्रतिनिधी कमी पडले असल्याचे चित्र सध्या हडपसर माळवाडी भागात पहायला मिळत आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना ऐन पावसाळ्यात रस्त्यावर बसून आंदोलन, उपोषण करण्याची वेळ आलेली आहे. मनपा अधिकारी व लोकपतिनिधी नागरी समस्यांकडे डोळेझाक करीत असून नागरी समस्यां सोडविण्यात अपयशी ठरत आहेत.

माळवाडी भैरवनाथ चौक परिसरात पाणी प्रश्न, ड्रेनेज प्रश्न, आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असताना समस्येकडे कोणीच लक्ष देत नसल्याचे नागरिक सांगत आहेत.

हडपसर मधील अमरधाम स्मशानभूमी समस्यांच्या विळख्यात अडकलेली आहे येथे अनेक सोयीसुविधांचा अभाव आहे, स्मशानभूमीला वाली नाही, साडेचारलाख लोकांच्या भावनेशी खेळ करणाऱ्या लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनाने सुधारणा केली नाही तर आंदोलन करु असा इशारा कांही घेतला आहे.



# आता साताऱ्यामध्ये 'हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण' : प्रक्रियेसाठी बाह्यरुग्ण विभाग सज्ज




## पुण्यातील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलद्वारे साताऱ्यातच रुग्णांना बाह्यरुग्ण विभागाच्या सुविधेचा लाभ मिळणार

**सातारा :** हृदय आणि फुफ्फुसाच्या अतिगंभीर आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पिंपरी, पुणे यांचे साताऱ्या मधील दोन ठिकाणी यामध्ये हार्ट लाईन डायग्नोसीस्ट प्रा. लि. उतेकर नगर, सदर बाजार, सातारा (अध्यक्ष - डॉ. रमेश चौगुले, व्यवस्थापकीय संचालक - डॉ. वर्षा कुलकर्णी,) आणि प्रतिभा हॉस्पिटल, जिल्हा परिषदेजवळ, सातारा (हृदयरोगतज्ज्ञ - डॉ.सोमनाथ साबळे, श्वसनविकार तज्ञ -डॉ. संजय साठे,) येथे बाह्यरुग्ण विभाग सुरु होत आहे. या सुविधेमुळे हृदय व फुफ्फुसांसंबंधीत रुग्णांना तज्ञांचे समुपदेशन व मार्गदर्शन मिळणे शक्य होईल. या ओपीडी द्वारे सातारा आणि आसपासच्या भागातील रुग्णांना याचा फायदा होणार आहे. तसेच ऑक्सिजनवर अवलंबून किंवा अतिगंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांवर काहीवेळा अवयव प्रत्यारोपण सुद्धा करावे लागतात त्याकरिता महाराष्ट्रातील रुग्णांना हैदराबाद, चेन्नई मध्ये जाऊन उपचार घ्यावे लागतात. ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसे दोन्ही मोठ्या प्रमाणात खर्च होतो. परंतु पुण्यातील डीपीयू हॉस्पिटलमध्ये आता ह्या प्रत्यारोपणाच्या सर्व सेवा सुविधा, अनुभवी कुशल डॉक्टरांच्या टीम उपलब्ध असल्याने वेळ व पैश्याची बचत देखील होईल. त्यामुळे सातारा परिसरातील रुग्णांना याचा लाभ होणार आहे.

फुप्फुस संबंधी दुर्धर, बऱ्या होऊ न शकणाऱ्या, कोवीडमुळे लंग फ्रायबोसीस झालेल्या, अंथरुणावर खिळलेले तसेच ऑक्सिजनवर अवलंबून असणाऱ्या रुग्णांसाठी आवश्यक उपचार व फुप्फुस किंवा हृदय प्रत्यारोपण सुविधा आणि यासंबंधी आजारांबाबत देखील मार्गदर्शन व प्रत्यारोपण सेवांची लोकांना माहिती व्हावी आणि त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे.

३ महिन्यांपूर्वी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे साताऱ्यातील एका ५४ वर्षाच्या महिलेवर यशस्वी दुहेरी फुफ्फुस प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे सातारा येथील पहिली दुहेरी फुफ्फुस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया आहे. जी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे करण्यात आली. रुग्णाला एक कौटुंबिक लंग फायब्रोसिस आजार होता जो त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्यांना सुद्धा होता, ज्या आजारामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला होता. गेली २ वर्षे रुग्ण ऑक्सिजनवर अवलंबून होते आणि तेंव्हा त्यांना जवळजवळ ६ लीटर प्रति मिनिट ऑक्सिजनची आवश्यकता भासत होती. परिणामी त्या अंथरुणाला खिळल्या होत्या आणि दैनंदिन कामांसाठी कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहावे लागत होते.

ह्या गुंतागुंतीच्या आजारासाठी रुग्ण साताऱ्यातील डॉ. संजय साठे, श्वसनविकार तज्ञ यांच्याकडे पाठपुरावा करत होता. त्यांनी या रुग्णाला फुफ्फुस प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला होता. या प्रकरणामध्ये रुग्णाला योग्य वेळी मार्गदर्शन मिळाल्यामुळे फेब्रुवारी महिन्यात डॉ. राहुल केंद्रे, फुफ्फुस प्रत्यारोपण व श्वसन विकार तज्ञ, आणि डॉ. संदीप अट्टावार, संचालक - हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे व किम्स हॉस्पिटल, चेन्नई यांच्या तज्ञ टीमने रुग्णाला पहिल्यांदा प्रत्यारोपणासाठी योग्यरीत्या तयार केले आणि नंतर मार्च महिन्यात रुग्णावर यशस्वीरीत्या प्रत्यारोपण केले. प्रत्यारोपणानंतर ३ आठवड्याने रुग्णाला घरी सोडण्यात आले असून त्या आता सामान्य जीवन जगत आहे.

डॉ.पी.डी. पाटील, कुलपती डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाले, आरोग्य सेवेतील आधुनिक तंत्रज्ञानाने नाविन्यपूर्ण संशोधनावर आणि प्रक्रियांवर आम्ही नेहमीच भर देत असतो, ज्यामुळे त्याचा अतिगंभीर आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांना फायदा होतो. आणि त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण परिसरातील जनतेला विविध प्रकारच्या आजारांवर सुलभ आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने आणखी काही शहरांमध्ये विविध ठिकाणी बाह्यरूग्ण विभाग सुरु करण्याचा आमचा मानस आहे.

डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र- कुलपती, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाल्या, महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहचून हृदय विकार, फुप्फुस प्रत्यारोपण सारख्या गंभीर आजारांवर जनतेला अधिकाधिक दर्जेदार आणि सर्वोत्तम वैद्यकीय सेवा मिळावी याच उद्दिष्टाने ही ओपीडी सुरु करण्यात आली आहे. आम्ही आरोग्यसेवेमध्ये सतत नवीन आणि आधुनिक अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे रुग्णसेवा जास्तीत जास्त सुरक्षित करण्यासाठी सतत कार्यशील आहोत.

डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व खजिनदार, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे म्हणाले, वैद्यकीय सेवेचे विस्तार होणे काळाची गरज आहे. त्यामुळे, अशा विभागवार ओपीडीच्या माध्यमातून रुग्णाचे आरोग्य हित साध्य व्हावे या दिशेने आम्ही कार्यरत आहोत. महाराष्ट्राच्या जनतेला जागतिक दर्जाची वैद्यकीय सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञान वापरून महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकांपर्यंत उत्तम तसेच अद्ययावत वैद्यकीय सेवा पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहोत.

डॉ. संदीप अट्टावार, संचालक - हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे व किम्स हॉस्पिटल, चेन्नई - या प्रकरणामध्ये रुग्णाला योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले त्यामुळे आमच्या तज्ञ टीमला प्रत्यारोपणासाठी योग्यरीत्या तयारी करता आली आणि रुग्णावर यशस्वीरीत्या प्रत्यारोपण करण्यात आले. फुफ्फुस आणि हृदय प्रत्यारोपण प्रक्रियेसाठी बाह्य विभाग सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे, कारण हे हॉस्पिटल आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांनी सुसज्ज रुग्णालय आहे.

या पत्रकार परिषदेला डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे फुफ्फुस प्रत्यारोपण व श्वसन विकार तज्ञ डॉ. राहुल केंद्रे, डॉ. समीर चौहान, कार्डियोवैस्कुलर थोरॅसिक सर्जन उपस्थित होते.

या बाह्यरुग्ण विभागाची माहिती सर्वांना व्हावी तसेच या सेवेचा लाभ हृदय व फुफ्फुस विकारांनी ग्रस्त रुग्णांनी घ्यावा असे आवाहन डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल द्वारे करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांसाठीच्या घोषणा फसव्या

**नाशिक :** केंद्र आणि राज्य सरकारच्या नो गॅरंटी कारभारामुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. निसर्गाची अवकृपा आणि सरकारकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकरी पिळवटून निघाला आहे. दुष्काळ, अवकाळी, गारपीट, कमी पर्जन्य, पाणी टंचाई, पिकावरील रोग अशी नैसर्गिक संकटे कायम उभी आहेतच. वाढता कर्जाचा बोजा, पिकविमा कंपन्यांकडून होणारी फसवणूक या संकटांचा सामना शेतकऱ्याच्या पाचवीला पुजला असून, आता सरकार पुरस्कृत संकट उभी केली जात असल्याचा हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेतेविजय वडेट्टीवार यांनी केला.

## कांदा व्यापाऱ्यांनीच शेतकऱ्यांना वेठीस धरलेय



**नाशिक :** भारतीय कांद्याला जगभरात मोठी बाजारपेठ आहे. आजही निर्यातीसाठी ५ लाख कांद्याची गरज आहे. शेतकऱ्यांकडे कांद्याचा साठाही आहे. परंतु व्यापाऱ्यांनी निर्यात मूल्याच्या मुद्द्यावर कांदा अडवून ठेवला आहे. शेतकऱ्यांना अडचणीत आणण्याचे काम व्यापाऱ्यांकडून होत असल्याचा आरोप महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.

नाशिक येथे पक्षाच्या अंतर्गत आढावा बैठकीसाठी आले असता पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हा आरोप केला. ते म्हणाले की कांद्याच्या दराबाबतच शेतकरी आणि व्यापारी असे दोन मतप्रवाह आहेत. ते शेतकऱ्यांसाठी नुकसानदायक आहे.

## पंढरपुरात मंदिरे गेली पाण्याखाली



**पंढरपुर :** वीर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे भीमा नदीत मोठया प्रमाणात पाणी दाखल झाले आहे. या अतिरिक्त पाण्यामुळे भीमा नदीला पुराची परिस्थिती निर्माण झाली असून पंढरपुर शहरातील वाळवंटात असलेली मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. शिवाय दगडी पूलही पाण्याखाली गेला आहे.

पंढरपूरआणि सोलापुरात मुसळधार पाऊस नसला तरी साताऱ्यातील मुसळधार पावसाने नीरा नदी दुथडी भरुन वाहत आहे. त्यामुळे नीरेवरील वीर धरणातून मोठा विसर्ग सोडण्यात आला. नीरा नरसिंगपूर येथे नीरा-भीमेचा संगम असल्याने भीमेत नीरा नरसिंगपूरपासून पाणी यायला लागले. त्यामुळे उजनी धरणातून भीमेत विसर्ग सोडला नसला तरी उजनीच्या पुढे निरेच्या संगमापासून नरसिंगपूर येथे भीमेच्या पाण्यात मोठी वाढ झाली ते पाणी पंढरपुरात आज पोचले.

# अतिवृष्टीने जोर खोऱ्याचा वाई तालुक्यातील संपर्क तुटला

## रस्ते, शेती गेली वाहून; जनजीवन विस्कळीत

**सातारा :** मागील काही दिवसात जोर खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीने रस्ते, शेती वाहून गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाई तालुक्याचा जनसंपर्क तुटला आहे. जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर पश्चिम भागातील रस्त्यांची अवस्था फार भयावह झाली आहे.आ. मकरंद पाटील यांनी सर्व यंत्रणांना परिस्थिती हाताळण्याच्या सूचना दिल्या आहेत.सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाकडून भर पावसात युद्धपातळीवर रस्ते दुरुस्तीला सुरवात झाली आहे.



मागील काही दिवसात झालेल्या जोरदार अतिवृष्टीने जोर खोऱ्यातील अतिवृष्टीने रस्ते वाहून गेले. जनजीवन विस्कळीत झाले.रस्ते भात, नाचणीची शेतेही वाहून गेली. यामुळे या परिसराचा वाई तालुक्याचा जनसंपर्क तुटला. सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाकडून भर पावसात युद्धपातळीवर मोठ मोठ्या यंत्रसामुग्री व्दारे रस्ते दुरुस्तीला सुरवात केली आहे. मुसळधार पावसामुळे जोर, गोळेवाडी, जाधव वस्ती व इतर पश्चिम भागातील रस्त्यांची अवस्था फार भयावह झाली आहे.

काही घरांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे या भागाचा वाई तालुक्यातील संपर्क तुटलेला आहे. आ.मकरंद पाटील प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार सोनाली मेटकरी, गटविकास अधिकारी विजय परीट, आरोग्य अधिकारी संदीप यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे महेश गोंजारी व जलसंपदा विभागाला ताबडतोबिने परिस्थिती नियंत्रणात आणण्याच्या सूचना दिल्या आहेत. तात्काळ या गावांचा वाई तालुक्याशी संपर्क जोडून देण्याची सूचना केल्या आहेत. आ. पाटील रविवारी या भागाचा दौरा करणार आहेत. जोर, गोळेवाडी, जाधव वस्ती व इतर संपर्क तुटलेल्या पश्चिम भागातील रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी पुणे येथील सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांची व मुंबई येथे या विभागाच्या सचिवांची रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी आ. मकरंद पाटील यांनी शुक्रवारी भेट घेऊन चर्चा केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता महेश गोंजारी व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी युद्ध पातळीवर संपर्क प्रस्थापित करण्यासाठी काम सुरू आहे.



**वांग-मराठवाडी धरणाच्या जलाशयात आढळून आलेल्या गव्याचा मृतदेह जलाशया बाहेर काढलेला मृतदेह.**

## जलाशयात बुडून गव्याचा मृत्यू

**ढेबेवाडी :** वांग-मराठवाडी धरणाच्या जलाशयात मृत झालेल्या गव्याचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याची घटना उघडकीस आली असून रात्री संचार करतांना बहुधा डोंगर कपारीत पाय घसरून नदी पात्रात पडून मानेला दुखापत होऊन जलाशयात बुडून मृत्यू झाल्याचा निष्कर्ष पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी काढला आहे.

याबाबत मिळालेल्या सविस्तर माहिती नुसार, आज सकाळी साडेनऊच्या सुमारास उमरकांचन ता. पाटण येथील काही ग्रामस्थांना जलाशयात तरंगणाऱ्या प्राण्याचा मृतदेह दिसल्यावर त्यांनी ढेबेवाडीच्या वन विभागाशी संपर्क साधून याची माहिती दिली.भोसगांवचे वनपाल शशिकांत नागरगोजे व त्यांच्या टिमने घटनास्थळी जाऊन पाहणी केली तेंव्हा तो गवा असल्याचे व जलाशयात सुमारे २०० फूट आत गव्याचा मृतदेह असल्याचे दिसून आले. अतिवृष्टीने आजूबाजूला सर्वत्र चिखलाची दलदल व अधून मधून कोसळणाऱ्या पावसाच्या सरी यामुळे जलाशयातून गव्याच्या मृतदेह बाहेर काढणे हे अग्निदिव्यच होते.

## विरवडे येथे अनाधिकृत गॅस सिलेंडरचा साठा जप्त

### २२ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत

**कराड :** विरवडे (ता. कराड) येथे पोलिसांनी छापा टाकून अनाधिकृत गॅस सिलेंडरचा साठा जप्त केला. शुक्रवारी मध्यरात्री १ वाजता ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी २७ भरलेले गॅस सिलेंडर जप्त केले आहेत. याबाबत पोलिस कॉन्स्टेबल महेश शिंदे यांनी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. याप्रकरणी गणेश नामदेव साळुंखे (वय ४० या विरवडे, ता. कराड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विरवडे येथील रेल्वे गेट नजीक असलेल्या एका पत्र्याच्या शेडमध्ये अनाधिकृत गॅस सिलेंडर टाक्यांचा साठा असल्याची गोपनीय माहिती पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र पवार यांना मिळाली. त्यानुसार डिवायएसपी अमोल ठाकूर व पोलिस निरीक्षक के. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र पवार, महेश शिंदे व पोलिस हवालदार मुळे यांच्या पथकाने शुक्रवारी मध्यरात्री १ वाजता छापा टाकला. यवेळी पोलिसांना सुमारे २२ हजार ४१० रूपये किमतीच्या भारत गॅस कंपनीच्या घरगुती वापराचे भरलेले गॅस सिलेंडर मिळून आले.

## पर्यटन वाढीच्यादृष्टीने वन खात्याच्या अखत्यारीत विकासकामे मार्गी लावा

### आ. शिवेंद्रसिंहराजे : उप वनसंरक्षक अदिती भारद्वाज यांना केल्या सूचना

**सातारा :** कास पठार, ठोसेघर आणि भांबावली धबधबा येथे वन विभागाची जागा आहे. पर्यटकांची सुरक्षा, सोयी सुविधा आणि पर्यटनस्थळांचा विकास या दृष्टीने वन खात्याच्या अखत्यारीत असणारी कामे वन विभागाने तातडीने मार्गी लावावीत. तसेच राज्य शासन पातळीवरून होणाऱ्या कामांसाठीचे प्रस्ताव तातडीने तयार करून ते शासनाकडे पाठवा, अशा सूचना आ. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

कास पठार, ठोसेघर धबधबा आणि भांबावली धबधबा या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या आणि सोयीच्या दृष्टीने प्रस्तावित कामे मार्गी लागावीत आणि पर्यटनस्थळांचा विकास



व्हावा यादृष्टीने आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी वन विभागाच्या कार्यालयात जाऊन उप वनसंरक्षक अदिती भारद्वाज यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले, शंकरराव चव्हाण, विठ्ठल कदम, जयराम चव्हाण, रविंद्र मोरे, सोमनाथ जाधव, दत्तात्रय किर्दत, रामचंद्र उंबरकर, प्रदीप कदम, दत्ताराम बादापुरे, ज्ञानेश्वर आखाडे यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि वन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वन विभागाच्या हद्दीतील घाटाई देवी रस्ता, ठोसेघर- मालदेव, बोंडारवाडी रस्ता आदी रस्त्यांची कामे मार्गी लावणे. ठोसेघर येथील धबधब्याच्या परिसरातील पायऱ्या व गॅलरीची दुरुस्ती करणे. ठोसेघर येथे झुलता पूल तयार करण्याचा सर्व्हे झाला.

## सफाई कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्या

### एम. व्यंकटेशन : सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या घेतल्या जाणून

**सातारा :** राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. व्यंकटेशन यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. बैठकीत उपस्थित झालेल्या समस्या प्रशासनाने सोडवाव्यात. त्याचबरोबर त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीबाबत बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात झाली. या बैठकीला आ. दीपक चव्हाण, जिल्हाधिकारी



जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नितीन उबाळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.महेश खलीपे, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट यांच्यासह विविध नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

व्यंकटेशन म्हणाले, सफाई कामगारी यांची प्रत्येक महिन्याला आरोग्य तपासणी करावी. बैठकीत उपस्थित केलेल्या तक्रारींबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावे. सफाई कर्मचाऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास आयोगाच्या दूरध्वनी क्रमांकावर तसेच संकेतस्थळावर कराव्यात. सफाई कर्मचाऱ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत या योजनांचाही लाभ देण्यात यावा, असेही निर्देश व्यंकटेशन यांनी दिले. सफाई कामगारांच्या शिक्षणानुसार त्यांना बढती देण्यात यावी.

## धरणातून पाणी सोडताना पुरस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी

**कराड :** कोयना धरणातुन पाणी सोडताना नदीकाठच्या गावात पुरस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. धरणात पाणी येतय म्हणुन जादा पाणी सोडू नये. त्यासाठी धरण व्यवस्थापनाने नियोजन करावे अशा सूचना मंत्री शंभूराज देसाई यांनी केल्या. दरम्यान, अल्लमट्टीमुळे सांगली, कोल्हापुरमध्ये पाणी प्रश्न निर्माण होवु नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले आहेत. सातारा, सांगली, कोल्हापुर जिल्ह्याला फटका बसणार नाही यासाठी कर्नाटक सरकारबरोबर आम्ही समन्वय ठेवुन आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले.




पुरस्थितीच्या पार्श्वभुमीवर पालकमंत्री देसाई यांनी आज आढावा बैठक घेतली. त्यामध्ये त्यांनी अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण, राजेंद्र यादव, प्रदीप पाटील, रणजीत पाटील, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार विजय पवार, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, कराड पालिकेचे मुख्याधिकारी शंकर खंदारे, पोलिस निरीक्षक के. एन. पाटील, तालुका पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप, एसटी आगाराच्या व्यवस्थापक शर्मिष्ठा पोळ, बांधकाम विभागाचे अधिकारी प्रमोद चौधरी, यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पालकमंत्री देसाई यांनी कोयना धरण व्यवस्थापनाचे अधिकारी पोतदार यांच्याकडुन धरणास्थितीची माहिती घेतली. यावेळी पोतदार यांनी कोयना धरणात सध्या ८३ टीएमसी पाणी असल्याचे सांगीतले.

## झोपी गेलेल्या तुम्हालाच जागे होण्याची; आत्मपरीक्षणाची गरज

### प्रभाकर देशमुख यांचा आ. जयकुमार गोरे यांना टोला

**दहिवडी :** धैर्यशील मोहिते-पाटील यांना खासदार होवून फक्त दोन महिनेच झालेत. दोन महिन्यात त्यांना जनतेचे दु:ख समजलेय मात्र पंधरा वर्षे आमदार असलेल्या माणसाला हे समजले नाही हे दुर्दैव आहे. खरंतर खासदारांना नाही तर झोपी गेलेल्या तुम्हालाच जागे होण्याची, आत्मपरीक्षणाची गरज आहे, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे नेते प्रभाकर देशमुख यांनी आ. जयकुमार गोरे यांना लगावला.



दहिवडी येथे संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सावंत, जिल्हा उपाध्यक्ष किशोर सोनवणे, भालचंद्र कदम, ॲड. संतोष पवार, हर्षदा देशमुख-जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रभाकर देशमुख म्हणाले, माण-खटावला २००९ पुर्वी जेवढे पाणी मिळाले त्यातील तिसरा हिस्सा पाणी आपण वापरतोय. आपल्या हक्काचे दोन हिस्से पाणी सांगली व सोलापूरला जातेय. ९७ साली जिहे-कटापुर योजना मंजूर झाली. पाण्याचे आरक्षण झाले. पाणी यायला मात्र एवढी वर्षे लागली. खरंतर दुष्काळी कालावधी आंधळी धरणात हे पाणी आले असताना माण नदीत सोडणे आवश्यक होते. दुर्दैवाने हे पाणी नदीत सोडले नाही. त्यामुळे ना दुष्काळाची दाहकता कमी झाली ना लोकांचे अश्रू थांबले. त्यांनी पाणी न सोडण्याचं पाप केल्यामुळे लोकांची पिके जळाली.

**खासदारांवर टिका करण्यामध्ये त्यांनी वेळ घालवू नये**

दिपक देशमुख यांनी आमदार जयकुमार गोरे यांच्यावरती गंभीर आरोप केले आहेत. एखाद्या लोकप्रतिनिधीवरती असे आरोप होणे आणि ते प्रकरण उच्च न्यायालयात जाणे, दोनशे मयतांवर उपचार केल्याचे दाखवून त्याचे पैसे हडपणे, हे सर्वच अतिशय गंभीर आहे. याबद्दल त्यांनी खुलासा करण्याची करण्याची आवश्यकता आहे. त्याबद्दल खुलासा न करता पाण्याच्या कामाला चालना देत असलेल्या खासदारांवर टिका करण्यामध्ये त्यांनी वेळ घालवू नये. याऐवजी हक्काच्या साडेबारा टीएमसीमधील दोन तृतीयांश पाणी का बाहेर जातेय हे सांगावे.

## चांदोली धरणातून विसर्ग वाढवला

**वारुणा :** पावसाचा जोर काल, शुक्रवारपासून कमी झाला असला तरी चांदोली धरणातील पाणीपातळी नियंत्रणात आणण्यासाठी पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे.धरणाच्याविद्युत निर्मिती केंद्रातून ६०० क्युसेक तर चार दरवाजा मधून १५७८५ क्युसेक असा एकूण १६ हजार ३८५ क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे.

आज अखेर एकूण २३४१ मी.मी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. धरणात १४५२० क्युसेक पाण्याची आवक होत आहे. ३४.४० टीएमसी क्षमतेच्या धरणात ३०.२४ टीएमसीपाणीसाठाझाला असून तो एकूण क्षमतेच्या ८७.९१ टक्के झाला आहे. शित्तुर वारुण परिसरात पूरस्थिती कायम असून मालेवाडी-विरळे, मालेवाडी-सोंडोली, चरण-सोंडोली, आरळा-शित्तुर वारुण, उखळू-शित्तुर वारुण भागातील सर्व मार्ग पाण्याखाली आहेत. पंधरा गावांचा संपर्क तुटला आहे. गेले आठ दिवस विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे मोबाइल सेवा बंद झाली आहेत.



## कास पठार ते कास धरण रस्त्यावर पाणीच पाणी

### वाहनधारकांची कसरत

**सातारा :** सध्या सातारा शहरात पावसाची संततधार सुरु असून शहरालगत असलेल्या बामणोली परिसरात रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. यामुळे स्थानिकांसह पर्यटकांना वाहने चालवताना प्रचंड कसरत करावी लागत आहे. अशात कास पठार ते कास धरण रस्ता मुसळधार पावसामुळे पाण्याखाली गेला असल्याने त्यासाठी सातारा नगरपालिकेने तयार केलेला नवीन कच्चा पर्यायी रस्ताही पाणी साचून खचला आहे. या ठिकाणाहून ये-जा करणारी वाहने अडकत आहेत.

कास पठार ते कास धरण रस्त्यावर पाणी साचत असल्याने त्यामध्ये अडकलेली वाहने काढण्यासाठी स्थानिक नागरिकांसह पर्यटकांना मोठी कसरत करावी लागत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांसह पर्यटकांमधून प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

कास बामणोली परिसरामध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. अतिवृष्टीमुळे कास व बामणोली परिसरामध्ये रस्त्यालगत दरडी कोसळत आहे. साईट पट्टया खचल्या असून कास बामणोली रस्त्याला काही ठिकाणी रस्त्यामध्ये झाडे पडलेली आहेत. कास धरणाची उंची वाढवल्यामुळे कास पठार ते कास धरण रस्ता पाण्याखाली गेला आहे. स्थानिक व पर्यटकांच्या गाड्यांसाठी सातारा नगरपालिकेने कास पठार रस्ता (बंगला) ते कास धरण असा पर्यायी नवीन कच्चा रस्ता तयार केला आहे. परंतु, सातारा नगरपालिकेने केलेला नवीन रस्ता खचला आहे. त्यातच रस्त्यामध्ये टाकलेली गटाराची पाइप छोटी असल्यामुळे मुसळधार पावसाचे पाणी सरळ डांबर रस्त्यावर येत आहे. मात्र, भर पावसात सर्वांनाच कसरत करावी लागली.